# विक्रम कुमार

भा.प्र.से.

महापालिका आयुक्त


1 0 DEC 2020

प्रति,
**पंचशिल फाऊंडेशन**
**पुणे.**

पुणे शहरामध्ये कोविड-१९ च्या रुग्णांच्या संख्येमध्ये सातत्याने वाढ होत होती. कोविड-१९ च्या क्रिटिकल रुग्णांना ऑक्सिजन व व्हेंटिलेटर यांची गरज भासत होती. शहरामध्ये असणारे सरकारी व खाजगी हॉस्पिटल यांची संख्या मर्यादित असल्याने सदर हॉस्पिटलमध्ये रुग्णांसाठी ऑक्सिजन बेड व आय.सी.यु. (व्हेंटिलेटर) बेड यांची संख्याही मर्यादित होती. सबब कोविड-१९ च्या रुग्णांना ऑक्सिजन बेड व आय.सी.यु. (व्हेंटिलेटर) बेड उपलब्ध होण्यामध्ये अडचणी येत होत्या.

रुग्णांना ऑक्सिजन बेड व आय.सी.यु. (व्हेंटिलेटर) बेडची पुरेशी उपलब्धता होत नसल्याने महापालिकेने बाणेर स.नं. १०९/२ येथील महापालिकेच्या सहा मजली इमारतीमध्ये कोविड-१९ च्या रुग्णांसाठी सी.एस.आर. फंडातून हॉस्पिटल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर इमारतीमध्ये १ ते ५ मजल्यांपर्यंत २७० ऑक्सिजन बेड व सहाव्या मजल्यावर ४४ आय.सी.यु. बेड यांची रचना करण्यात आली. आपण सदर हॉस्पिटलमध्ये आय.सी.यु. साठी एअर कंडिशन यंत्रणा, हॉस्पिटलसाठीचे बेडस्, मेडिकल ऑक्सिजन पाईपिंग सिस्टिम व इमारतींमध्ये हॉस्पिटलच्या अनुषंगाने करावयाची बांधकाम विषयक कामे आपल्या संस्थेने सी.एस.आर. मधून करुन दिलेली आहेत.

वरील सर्व कामे करुन दिल्याने सदर हॉस्पिटल २१ दिवसांमध्ये उभारणी शक्य झाले आहे. सदर हॉस्पिटलसाठी केलेल्या आर्थिक सहकार्याबद्दल आभारी आहे.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका